<u>नि. फौ. ख. क्र.१९०/२०१९</u> निशाणी क्र.२९

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.1 यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – पंकज श्रीराम खोंड

वय – ३७ वर्षे, व्यवसाय – नोकरी

पत्ता – रा. पारस, ता. बाळापूर, जि. अकोला

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी पारस औष्णीक ऊर्जा केंद्र या ठिकाणी सन २०१७ ते आज पर्यंत सहा. अभियंता म्हणून कार्यरत आहे. दि.१३.०७.२०१९ रोजी मी माझ्या घरी होतो. त्या दिवशी संध्या. ६.३० वा. सुमारास आमच्या पेट्रोलिंग करणारे कर्मचाऱ्यांचा मला फोन आला व त्यांनी मला सांगितले की, दोन इसम लगुन क्र.२ येथे राख वाहून नेणारी १५० एमएल ची लोखंडी पाईप कापत आहेत. त्यानंतर मी माझ्या सुरक्षा विभागामध्ये फोन केला. त्या ठिकाणी त्या वेळी कार्यरत असलेले सुरक्षा अधिकारी श्री. पांडे यांना मी मला मिळालेल्या बातमीची माहिती दिली. त्यानंतर मी, श्री. पांडे व इतर दोन सुरक्षा रक्षक यांच्या समावेत लगुन क्र.२ औष्णीक ऊर्जा प्रकल्प येथे गेलो. तेथे आम्हाला दोन इसम पाईप कापत असताना दिसून आले. त्या दोघांपैकी एकाने आम्हाला पाहीले आणि तेथून तो पळून जावू लागला. तसेच दुसरा इसम यास आम्ही पकडण्याचा प्रयत्न केला परंतु तो देखील तेथून पळून गेला. आम्ही सदर जागेची पाहणी केली असता त्या जागेवरुन आम्हाला एक दुचाकी मोटारसायकल व लोखंडी पाईप कापण्याचा करवत मिळून आला. तसेच सदर लोखंडी पाईप हा अर्धवट कापलेला दिसून आला. तसेच इतर लोखंडी पाईपचे कापलेले तुकडे मिळून आले. आमच्या सोबत असलेले सुरक्षा रक्षक यांनी कापलेले तुकटे, करवत व दुचाकी मोटारसायकल ताब्यात घेतली.

२. सदर घटनेबाबतची फिर्याद मी बाळापूर पो.स्टे. येथे सदर दोन अज्ञात इसमाविरुध्द दिली. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात

येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३१** देण्यात येत आहे. सदरची फिर्याद ही घटनेच्या तीन दिवसानंतर मी पो.स्टे.ला दिली, कारण सदर घटनेची माहिती आमचे वरीष्ठ अभियंता यांना देण्याचे गरजेचे होते तसेच त्यांच्या कडून आम्हाला फिर्याद दाखल करण्याचे आदेश मिळाल्यानंतर सदरची फिर्याद दाखल केली.

३. सदर गुन्ह्याबाबत पोलीसांनी माझी चौकशी केली होती तसेच पोलीस लगुन क्र.२ या ठिकाणी आले होते त्यावेळी मी त्यांना घटनास्थळ दाखविले होते. सदर दोन इसमापैकी एकास पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही. आरोपी क्र.१ आज न्यायालयात हजर नाही, परंतु त्याच्या ओळखीबाबत कोणताही वाद त्याच्या वकीलांकडून उपस्थीत करण्यात आलेला नाही. लोखंडी पाईपचे तुकडे, करवत व दुचाकी मोटारसायकल दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला न्यायालयासमोर एक लाल रंगाचा लोखंडी फ्रेम त्यास एक सॉ ब्लेड असलेला तसेच त्यावर पंचांच्या सहीचे कागदी लेबल लावलेला करवत दाखविण्यात आला, तो तोच असून आम्हाला घटनास्थळावर मिळून आला. त्यास **आर्टीकल १** देण्यात येत आहे. तसेच दोन कापलेले लोखंडी पाईप व एक एल बो आकाराचा कापलेला लोखंडी पाईप त्यावर पंचांच्या सहीचे कागदी लेबल चिकटविलेले असून ते न्यायालयात सादर करण्यात आले सदरचे दोन कापलेले लोखंडी पाईप व एक एल बो आकाराचा कापलेला लोखंडी पाईप तोच आहे. त्यास **आर्टीकल २ ते ४** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. एच. शेगोकार यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. मी माझा जबाब पोलीसांना देतेवेळी ''सदर लोखंडी पाईप हा अर्धवट कापलेला दिसून आला, तसेच इतर लोखंडी पाईपचे कापलेले तुकडे मिळून आले, तसेच आमच्या सोबत असलेले सुरक्षा रक्षक यांनी कापलेले तुकटे, करवत व दुचाकी मोटारसायकल ताब्यात घेतली'' हा मजकूर मी माझा जबाब देतेवेळी पोलीसांना सांगितला होता, परंतु सदर मजकूर माझ्या जबाबामध्ये का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, औष्णीक ऊर्जा केंद्रामध्ये चहू बाजूने सुरक्षा रक्षक चहू बाजूने गस्त घालत असतात. हे म्हणणे खरे नाही की, लगुन क्र.२ येथे आमच्या औष्णीक ऊर्जा केंद्राचे कर्मचारी व्यतिरीक्त कोणीही जावू शकत नाही. लगुन क्र.२ या ठिकाणी आमचे कर्मचारी कामाकरीता हजर असतात. हे म्हणणे खरे आहे की, पारस औष्णीक ऊर्जा केंद्रातून बाळापूर येथे येण्याकरीता अर्धा तास अवधी लागतो. हे म्हणणे खरे आहे की, लगुन क्र.२ मध्ये मजूर काम करीत असतात. परंतु मजकूरांचे काम सतत चालू असते हे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. पोलीस पंचनामा करण्याकरीता घटनास्थळी आले होते, त्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी आले नाहीत. पारस औष्णीक ऊर्जा प्रकल्पातून रेल्वे लाईन गेलेली आहे. लगुन क्र.२ येथे रेल्वे लाईन नाही. हे म्हणणे खरे आहे की, लगुन क्र.२ याच्या आजूबाजूला शेत जमीन आहे. त्या ठिकाणी शेत मजूर काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी कोणताही घटनास्थळ पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरची फिर्यादी खोटी दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल २ ते ४ कडील लोखंडी पाईप हे आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या पाण्याचे पाईप आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल १ कडील करवत हा बाजारात सहज उपलब्ध होतो. सदर लोखंडी पाईपचे बिल मी तपासिक अधिकारी यांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पुरावा देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०८.०९.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.09.08 17:26:28 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०८/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०८/०९/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०८/०९/२०२५ |